लोकमत

## येत्या जूनपर्यंत दोन नवीन फलाट : पाचोऱ्यातील स्वच्छता पाहून महाव्यवस्थापक खूष

# भुसावळ रेल्वे स्थानक देशात महत्वाचे

लोकमत न्यूज नेटवर्क

**भुसावळ/ पाचोरा :** मध्य रेल्वेचे भुसावळ रेल्वे स्थानक हे भारतीय रेल्वेत सर्वात महत्त्वाचे व मध्यभागी आहे. येणाऱ्या काही वर्षात अत्यंत आधुनिकीकरणाने भुसावळ स्थानकाची वेगळी ओळख निर्माण होईल. असा आशावाद मध्य रेल्वेचे सरव्यवस्थापक डी.के.शर्मा यांनी शनिवारी डीआरएम कार्यालयात पत्रकार परिषदेत दिली. तर दुसरीकडे पाचोरा रेल्वे स्थानकाला स्पॉड अवॉर्ड देण्यात आला.

त्यांच्या स्वागतासाठी भुसावळ स्थानक स्वच्छ करून रंगरंगोटी करुन सजविण्यात आले होते. दौऱ्याची सुरूवात फलाट क्रमांक ७-८ वरील पाणपोईचे उद्घाटन करून झाले. फलाट क्रमांक चारवर स्वयंचलित तिकीट किट लॉचिंगचे उद्घाटन झाले. फलाट क्रमांक तीनवर अंजता-एलोरा पेंटींगचे त्यांनी निरीक्षण केले.

दौऱ्यात पुढे बसस्थानक समोरील अतिक्रमित जागेची पाहणी व नियोजनवर चर्चा केली. पार्किंग व्यवस्था, स्वच्छतागृह याची ही पाहणी केली. पेट्रोल डिझेल डेपोच्या बाजूला उभारण्यात आलेल्या सेंद्रीय खत प्रकल्पाची पाहणी केली.

डीआरएम यादव यांचे कौतुक

डीआरएम आर.के.यादव यांनी भुसावळ रेल्वे विभागात वर्षभरात चांगले काम केले आहे. पुढील पाच वर्षात भुसावळ रेल्वे स्थानकाचे नाव रेल्वेच्या पहिला पाचमध्ये असेल हे नक्की असे गौरवोद्गार काढले. अतिक्रमण,स्वच्छता, प्रवासी समस्या, कर्मचारी समस्या हे प्रश्न सोडविण्यासाठी यादव यांनी प्रयत्न केले.

**येत्या जूनपर्यंत दोन नवे फलाट**

भुसावळ रेल्वेस्थानक नेहमी गजबजलेले स्थानक आहे. फलाटांची संख्या कमी असल्यामुळे प्रवासी गाड्यांना आऊटरवर थांबवावे लागते. यावर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी येत्या जूनपर्यंत दोन फलाटांची निर्मिती करण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

### पाचोरा रेल्वे स्थानकाला स्पॉट अॅवार्ड

◆ पाचोरा- रेल्वेस्थानकास नवे रुप आले असून सेंट्रल रेल्वेचे महाप्रबंधक देवेनद्र के.शर्मा यांनी पाहणी करून उत्कृष्तेचा स्पॉट अॅवार्ड रेल्वेस्थानकास घोषित केला. २0 हजाराचे बक्षीस तात्काळ पाचोरा रेल्वे स्थानकाचे वाणिज्य प्रबंधक बागूल यांना देण्यात आले. आज दुपारी ३ वाजता स्पेशल गाडीने डी.के.शर्मा, शैलेंद्र सिंघीया, आर.के.यादव यांचेसह ६0 वरिष्ठ अधिकारी पाहणी दौऱ्यात येथे आले होते. भाजपाचे अमोल शिंदे यांनी स्वखचनि पाचोरा रेल्वे स्थानकावर शेडसह बाके ८ ठिकाणी बसविले त्याचे लोकार्पण करण्यात आले. रेल्वेतर्फे स्थानकास रंगरंगोटी करण्यात आली होती. स्टेशन स्वच्छ व सुंदर पाहून महाप्रबंधक डी.के.शर्मा खूष झाले. यावेळी स्टेशनमास्तर सीताराम पाटील, वाणिज्य विभागाचे एस.डी.बागूल यांचेसह सर्व रेल्वे कर्मचारी अधिकारी उपस्थित होते. दरम्यान पाहणी दौऱ्यात रेल्वेच्या आवारातील अनधिकृत स्टॉल आज पूर्णपणे बंद होते. हे स्टॉल काढून तेथे मोठी भिंत उभारण्याचे शर्मा यांनी सूचित केले. रेल्वे हद्दीतील अनधिकृत स्टॉल हटविण्याचे तोंडी आदेशही दिले. यावेळी ट्रेनलाईव्ह पोझिशन ग्रुप, प्रवाशांनी मागण्यांचे निवेदन दिले.

भुसावळहून रात्री १२.२५ ला हुतात्मा एक्स्प्रेसमुळे प्रवाशांची सोय झाली आहे. या गाडीला स्लीपर कोच नसल्यामुळे प्रवाशांचे हाल होतात इंटरसिटी जरी असली तरी रात्रीचा प्रवास व लांब पल्ला असल्याने डबे लावण्यासाठी सोलापूर मंडळाशी चर्चा करण्यात येईल.

उत्तर भारतीय व खान्देशातील प्रवासी रात्रीच्या सुरत पॅसेंजरने प्रवास करतात या गाडीला ही स्लीपरचे जादा डबे लावण्यासंदर्भात पश्चिम रेल्वेशी चर्चा करून हा प्रश्न सोडविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

१८ बुलेटला हिरवी झेंडी

रेल्वे सुरक्षा बलाच्या जवानांनी सतर्क, तत्पर, कामाची गतिमानता यासाठी १८ नवीन बुलेट घेण्यात आल्या आहेत. त्याचे उद्घाटन करण्यात आले.

प्रसंगी वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक सुनील मिश्रा, सीसीएम शैलेंद्रकुमार, सीएससी ए. के.श्रीवास्तव, ए.के.जैन, मनोजकुमार सिन्हा, व.म.परि.प्रबंधक नरपतसिंह, व.म.सुरक्षा अधिकारी ए.पी.दुबे, मुख्य जनसंपर्क अधिकारी सुनील उदासी, रेल्वेचे सर्व विभागाचे अधिकारी, जीवन चौधरी आदी उपस्थित होते.

**आमदार उन्मेष पाटील यांनी दिले निवेदन**

रेल्वेशी संबंधित विविध मागण्यांचे निवेदन देवेंद्रकुमार शर्मा, रेल्वे महाप्रबंधक (मुबंई) यांना चाळीसगावचे आमदार उन्मेष पाटील यांच्यावतीने चाळीसगाव रेल्वे स्थानकावर देण्यात आले. यावेळी नगरसेवक संजय रतनसिंग पाटील, घृष्णेश्वर पाटील, नितीन पाटील, चंदूभाऊ तायडे, रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी व रेल्वे प्रवाशी संघटनांचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यात महानगरी, कर्नाटका, पवन, गोवा, मंगला अमरावती, गुवाहाटी आदी एक्सप्रेस गाड्यांना थांबा देण्यात यावा, चाळीसगाव - औरंगाबाद रेल्वे लाईनचे काम सुरु करण्यात यावे,प्लॅटफोर्म शेड्स वाढविण्यात यावेत या मागण्यांचा समावेश होता.